"कृतज्ञता"

"सावित्रीच्या लेकींप्रती"

स्त्रीरूपे विविध किती, ओवाळावी आरतीने
मातृदेवो भव: म्हणूनी, केला जयजयकार भारतभारतीने ----
उपेक्षिले, दुर्लक्षिले आजवरी तिला विनाकारण
सातत्य समाजाचे अढळ, तिच त्याचे कारण
जाण येताच स्त्रीशक्तीची, आली समाज शरण
प्रतिक वात्सल्याचे म्हणून स्विकारिले परंपरेने
मातृदेवो भव: म्हणूनी, केला जयजयकार भारतभारतीने ---
हृदयी अमृत नयनी पाणी, स्त्री होती बंदिनी
सबलीकरणाने चमकली सौदामिनी, अशी केली प्रगती तिनी
लढा अधिकारांचा, प्रतिकार अन्यायांचा करते ही कामिनी
संक्रमण समाजाचे घडणार कसे, हे अभ्यासिते बारकाईने
मातृदेवो भव: म्हणूनी, केला जयजयकार भारतभारतीने ----
खुले आज तिच्यासाठी प्रांगण दशदिशांचे
वेध घेते सहज लिलये ती अवकाशाचे
हाताळतांना यंत्र गुंतागुंतीचे, भान ना कशाचे
अशी गुणी रत्नपारखी चमकली यशकीर्तीने -
मातृदेवो भव: म्हणूनी केला जयजयकार भारतभारतीने ----
स्त्रीशिक्षणाच्या वटवृक्षाला लाभले मूक, सावित्रीबाईंच्या अथक परिश्रमाचे
अंधारात जणू चमकला तारा, झाले मोकळे आकाश ज्ञान कर्तृत्वाचे
आजन्म गिरवूनी स्त्रीशिक्षणाचे धडे, समाजात दिले स्थान मानाचे
प्रसंगी पत्करीला रोष, पण ध्येय गाठले हिमतीने अन् शिकस्तीने
म्हणूनी 'मातृदेवो भव:' म्हणूनी केला जयजयकार भारत भारतीने ----

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी
मोबा.नं. 8308694751


43